Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या समग्र व्यक्तीमत्व विकासात नाटय आणि कलात्मक अभिव्यक्तीची परिणामकारकता अभ्यासणे.

**मार्गदर्शक**
**प्राचार्य डॉ.सुहासकुमार रुपराव पाटील**
शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ

**संशोधनार्थी**
**सहाय्यक प्रा.जया दिगांबरराव लेंडे**
शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ

## गोषवारा :

अभिव्यक्तीची पुर्णता ही जीवनाची पुर्णता आहे . मानवाच्या अभिव्यक्तीला केवळ शब्दाच्या भाषेमधुन व्यक्त व्हावयास वाव मिळत नाही , त्याला रंग, रेषा, ध्वनी, स्पंदन, अशा दुसऱ्या भाषाचांही आश्रय शोधावा लागतो. चित्रकला मूर्तीकला, संगीत , नृत्य, सर्वांगीन शिक्षणाचे अपरिहार्य घटक आहेत.

विद्येची देवता काव्यनृत्यादी ललित कलांचीही अधिष्ठात्री देवता आहे.विद्यार्थी केवळ बौध्दीक बनता सौम्य, सहिष्णु असावा अभ्यासक्रमाचे संस्कार विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देणारे असताता त्यांचा बौध्दीक, भावनिक, मानसिक,कृतीयुक्त विकासाचा मेळ केवळ शिकण्याला कृतीची जोड दिल्यास शक्य आहे. याकरीता उपलब्ध पाठ्यांश अध्यापनाकरीता नाट्य व कलात्मक अविष्काराची जोड परिनामकारक आहे.

## प्रस्तावना:

### चित्रकलेच्या अभ्यासक्रमातून अपेक्षा – विनोबा भावे

संगीताने परमेश्वराचे नामस्मरण करावे, चित्रकलेने त्याचे रुप रेखाटावे, चित्रकलेने मुलांच्या नुसत्या बोटांना वळण लागून पुरे नाही, त्याचा डोळा चित्रकलेत तरबेज पाहिजे, बसतांना मुले ताठ बसली आहे की नाहीत

कवायतीत सारख्या अंतराने उभी आहेत की नाही वगैरे चित्रकलेची दृष्टी आहे. सृजनात्मक कल्पना चित्रात साकार करणे, रेखीव, आखीव, स्मरीव आणि कल्पिव रेखनाचा यात समावेश होतो. यामुळे विद्यार्थ्यांच्या सृजनात्मक कल्पकतेला कलात्मक अभिव्यक्तीला संधी मिळण्यास मदत होते.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज –

मुलांना शिकवाव्या नाना कला / चापल्य ध्येय निष्ठाधी सकला/
गावची सांभाळू शकेल आपला / ऐसे द्यावे शिक्षण/

मनुष्य आपल्या आनंदाची अभिव्यक्ती संगीत, / वाङमय विविध कलांमधून करीत असतो. भारतीय संस्कृती प्राचीन काळापासून संगीत,नृत्य,शिल्पकला विकसीत झालेली आहे. आदीवासी संस्कृतीत नृत्य हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. जीवनात नृत्याने आनंदाचे प्रकटीकरण होते. दु:खाचा विसर पडतो. मानवी जीवनाला एक नवा अर्थ प्राप्त होतो. शिकण्याच्या पध्दतीत नैसर्गीकता येते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## बलोद्यान पध्दती – फ्रोबेल

संगीताची व गीताची बालकांना नैसर्गीकरित्या आवड असते. हे लक्षात घेवून फ्रोबेलने आपल्या बलोद्यान पध्दतीत संगीतबध्द सभिनय गाणी याला महत्व दिले. अभिनय गीते, नृत्य गीते, समूह गीते यातुन बालकाचा शारिरीक, मानसिक विकास साध्य करता येतो. विविध शारीरीक हालचालीतुन बालकांना श्रमाचा कंटाळा नसतो. रचनात्मक कृती करण्याची त्यांना मनस्वी आवड असते.

## नाट्य –

नाट्य म्हणजे आकर्षकता, परिणामकारकता रसोत्कटता, नाट्यीकरण म्हणजे रसोत्कटतेची, भावनोत्कटतेची परिणामकारक अभिव्यक्ती करणे होय. अपरिचित भूतकाळ, अमुर्त संकल्पना, संवेदनशिल प्रसंग, एकांकीका, मुकनाट्य, प्रासंगिक नाट्य, सामाजिक आंतरक्रीयेकरिता बालकांना तयार करतात.

## उद्दीष्ट –

कलात्मक अभिव्यक्ती कौशल्य संपादनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासात नाट्य व कलात्मक अविष्काराची परिणामकारकता तपासणे.

नाट्य व कलात्मक अविष्कारातून प्रभूत्व अध्ययनासाठी अभिरुची निर्माण करणे.

## परिकल्पना-

कलात्मक अभिव्यक्तीकरीता विद्यार्थ्यांना कृतीयुक्त सहभागास संधी दिल्यास संवेदनशील व्यक्तिमत्व विकसीत होईल.

पाठ्यांशाच्या आधारे सराव करुन घेतल्यास विद्यार्थ्यांची कलात्मक अभिरुची समृध्द होईल.

## संशोधन पध्दती-

प्रस्तुत संशोधनाकरिता प्रायोगिक पध्दती, एकल गट अभिकल्प वापरण्यात आला.

**न्यादर्श-** माध्यमिक स्तरावरील 50 विद्यार्थ्यांची सहेतूक पध्दतीने निवड केली.

सशोधनाची साधने- पुर्व चाचणी, उत्तर चाचणी , प्रश्नावली

संशोधनाची कार्यवाही – एकल गट अभिकल्प, ठराविक पाठ्यांश आधारित पुर्वचाचणी देवून अडचणींचा शोध घेतल्या गेला. त्यानंतर पाठ्यांशावर आधारित कलात्मक अभिव्यक्ती उपक्रमांची अंमलबजावणी करुन उत्तर चाचणीच्या माध्यमातून माहिती संकलीत करण्यात आली.

## माहितीचे अर्थनिर्वचन –

मध्यमान, सांख्यिकीय परिमाणे आधारित प्राप्तांकाचे अर्थनिर्वचन करण्यात आले.

**विश्लेषण पध्दती:** प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करुन शेकडा प्रमाण काढून विश्लेषण करण्यात आले.

उद्दीष्ट निहाय विश्लेषण पुढीलप्रमाणे –

**उद्दीष्ट क्रमांक 1)** कलात्मक अभिव्यक्ती कौशल्य संपादनात अडचणीचा शोध घेणे. या विधानाला प्रतिसाद देतांना सहमत असा प्रतिसाद शेकडा प्रमाण 64 टक्के आहे. पूर्णपणे सहमत या विधानास शेकडा प्रमाण 36 टक्के आहे. यावरुन विद्यार्थ्यांना साधन साहित्य रंगमंच व्यवस्था उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

**उद्दीष्ट क्रमांक 2)** विद्यार्थी व्यक्तीमत्व विकासात नाट्य व कलात्मक अविष्काराची परिणामकारकता अभ्यासणे. या विधानास सहमत या बाजुने शेकडा प्रमाण 75 टक्के विद्यार्थी प्रतिसाद आहे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

तर पूर्णपणे सहमत शेकडा प्रमाण 25 टक्के आहे यावरून पाठ्यांश आधारित कलात्मक अध्ययन सराव केल्यास विषयाची अभिरुची निर्माण करण्यास मदत होते.

**उद्दीष्ट क्रमांक 3)** नाट्य व कलात्मक अविष्कारातून प्रभुत्व अध्यापनासाठी अभिरुची निर्माण करणे.

या विधानास शेकडा प्रमाण 70 टक्के पुर्ण सहमत आहे तर शेकडा प्रमाण 30 टक्के विद्यार्थी प्रतिसाद सहमत या बाजुने आहे. यावरुन सुप्त कलागुणांना शालेय व्यासपिठावर संधी दिल्यास सर्वांगीण विकास साधता येतो.

## निष्कर्ष –

विद्यार्थ्यांना भूमिकाभिनय व कलात्मक अविष्कार संधीमुळे अभिव्यक्ती कौशल्य संपादनात परिणामकारकता आली.
नाट्य व कलात्मक अविष्कारामुळे अध्ययनात अभिरुची निर्माण झाली.
कृतीयुक्त सहभागामुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.
कला व नाट्य अभिव्यक्तीमुळे विद्यार्थी सामाजिक आंतरक्रीयेसाठी सक्षम झाल.
विद्यार्थ्यांना वास्तव जिवनातील समस्यांची जाणीव करुन देता आली.
सामाजिक परिस्थितीकरीता व्यक्तीच्या वर्तनाला दिशा मिळाली.
विविध संकल्पना, अमुर्त कल्पना यांना मुर्त स्वरुप देता आले.

## शिफारसी –

भुमिकापालन प्रतिमा तंत्राचा वर्ग अध्यापनात वापर व शैक्षणिक संपादणूक सहसंबंधात्मक अभ्यास.
इतिहास, मराठी, सामाजिक शास्त्र विषयाच्या पाठ्यांश अध्यापनासाठी नाट्यात्मक प्रकटीकरण विश्लेषणात्मक अभ्यास.

## संदर्भ

पांडे, रामेश्वरी (2011) भारतातील शिक्षण, लेखा आणि कौशल्य विकास, न्यू सेंच्युरी पब्लिकेशन्स, नवी दिल्ली,
मुळे आणि वि. तु. उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे', नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथ निर्मिती मंडळ.
जगताप ह.ना. (२००६) शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास, पुणे, नूतन प्रकाशन.
के. म. भांडारकर " सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र ", पुणे : नित्य नूतन प्रकाशन,

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985